## अमरावती महानगरपालिका, अमरावती
## दिनांक 09.6.2023 रोजी प्राप्त प्रशासकीय विषय

**(प्रशासकीय विषय)**

**विषय क्रमांक 88** - महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवनसंरक्षक उपाययोजना (सुधारणा) अधिनियम,२०२३ नुसार अग्निशमन वआपत्कालीन सेवा फी आकारणी करण्याबाबत.

**ठराव क्रमांक 88** - अमरावती महानगरपालिकेचे आर्थिक सक्षमीकरणाचे उद्दीष्ट्ये समोर ठेवून अग्निशमन विभागामार्फत देण्यात येणारे ना-हरकत प्रमाण चे शुल्क, नुतनीकरण शुल्क व इतर शुल्काचे निश्चितीकरण नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचे क्र.नप्रसं/ अग्निशमन सेवा / २००५/प्र.क्र.३१४/९ दिनांक २५ एप्रिल २००५ चे स्थायी निर्देश मध्ये नमुद केल्यानुसार करावयाचे होते. त्यानुसार अमरावती महानगरपालिकेने वरील संदर्भीय क्रमांक २ अन्वये ना-हरकत प्रमाण चे शुल्क, नुतनीकरण शुल्क व इतर शुल्काचे निश्चितीकरण केले होते.परंतु वरील संदर्भीय स्थायी निर्देश हे २००५ चे तसेच अमरावती महानगरपालिकेने शुल्क निश्चितीकरण सन २०१८ मध्ये केलेले असल्यामुळे सदर शुल्काच्या दरामध्ये नैसर्गिक वाढ करणे अपेक्षित होते. त्यानुसार अग्निशमन विभाग, अमरावती महानगरपालिकेतर्फे नागपूर महानगरपालिका, अकोला महानगरपालिका, पुणे महानगरपालिका तसेच महाराष्ट्र औद्योगीक विकास महामंडळ, मुंबई यांचेकडून त्यांचे मार्फत अग्निशमन विभागाशी संबंधित आकारण्यात येणाऱ्या शुल्काबाबत माहिती घेण्यात आली.नागपूर महानगरपालिका, अकोला महानगरपालिका, पुणे महानगरपालिका तसेच महाराष्ट्र औद्योगीक विकास महामंडळ, मुंबई यांचेकडून प्राप्त माहितीनुसार त्यांचे मार्फत अग्निशमन विभागाशी संबंधित आकारण्यात येणाऱ्या शुल्काबाबत तयार करण्यात आलेल्या तक्त्याचे अवलोकन केले असता असे लक्षात येईल कि, नागपूर महानगरपालिकेचे दर निश्चितीकरण सन २००९ मध्ये, अकोला महानगरपालिकेचे दर निश्चितीकरण सन २०१५ मध्ये, पुणे महानगरपालिकेचे दर निश्चितीकरण सन २००७ मध्ये तसेच महाराष्ट्र औद्योगीक विकास महामंडळ, मुंबई यांचे दर निश्चितीकरण सन २०२३ मध्ये करण्यात आले असून त्यातुलनेत अमरावती महानगरपालिकेचे दर निश्चितीकरण सन २०१८ मध्ये झालेले असून सुद्धा अमरावती महानगरपालिकेचे दर वरील नमूद सर्व महानगरपालिकेच्या तुलनेत अत्यंत कमी आहेत. सबब, अमरावती महानगरपालिकेचे आर्थिक उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने तसेच इतर

महानगरपालिकेच्या तुलनेत ना-हरकत प्रमाण चे शुल्क, नुतनीकरण शुल्क व इतर शुल्काचे दर अत्यंत कमी असल्यामुळे नैसर्गिक वाढ करणे अपेक्षित होते. त्यामुळे अनुसुची प्रमाणे तपशिलवार विवरणासह शुल्क मध्ये वाढ प्रस्तावित करण्यास मा.आयुक्त यांनी मंजुरी प्रदान केल्यानंतर मा.स्थायी समितीचे ठराव क्र. ७५ दिनांक २९/०३/२०२३ रोजी मंजुरी प्राप्त झाली. सदर प्रस्तावास राज्य शासनाची मंजुरी घेणे आवश्यक असल्यामुळे प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविण्यात आला.परंतु वरील संदर्भीय क्र.३ अन्वये महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, मुंबई यांनी नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य,पुणे यांनी वेळोवेळी निश्चित केलेल्या विवरणपत्रातील बांधकामाच्या वार्षिक मूल्य दराच्या (एएसआर) अनुसूची-दोन मध्ये दर्शविलेल्या टक्केवारीनुसार अग्निशमन व आपत्कालीन सेवा फीची परीगणना करावयाची असून सदर फी दिनांक ३० मे २०२३ पासून सर्व अग्निशमन सेवांनी लागू करणेबाबत निर्देशित केले.त्यानुसार अमरावती महानगरपालिकेकरिता खालीलप्रमाणे प्रति चौ.मी. करिता दर ठरवून देण्यात आले आहेत.

| **आर.सी.सी. बांधकाम** | **इतर पक्के बांधकाम** | **अर्ध पक्के बांधकाम** | **कच्चे बांधकाम** |
|---|---|---|---|
| २२,९९०/- | १८,६५३/- | १३,१६७/- | ८,४४९/- |

वरील दरानुसार अग्निशमन फी आकारणी करिता वार्षिक दर विवरणपत्राच्या टक्केवारीनुसार (एएसआर) परिगणना करावयाची आहे. वार्षिक दर विवरणपत्राच्या टक्केवारीचा नमुना खालीलप्रमाणे.

| **अनु.क्र.** | **इमारतीची उंची मीटरमध्ये** | **वार्षिक दर विवरणपत्राच्या टक्केवारीनुसार (एएसआर)** | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | **निवासी** | **संस्थेची इमारत** | **वाणिज्यिक** | **औद्योगिक** |
| १ | ४५ मी.पर्यंतची इमारत | ०.२५% | ०.५०% | ०.७५% | ०.७५% |
| २ | ४५ मी. पेक्षा उंच इमारत | ०.५०% | ०.७५% | १.००% | १.००% |

वरील तक्त्यानुसार खालीलप्रमाणे अग्निशमन फी आकारणी करणेकरिता भारतीय राष्ट्रीय इमारत संहितेच्या भाग ४ मध्ये वर्गीकृत केल्याप्रमाणे खालीलप्रमाणे प्रति चौ.मी. करिता दराची परिगणना होत आहे.

### ४५ मी.पर्यंतची इमारत

| इमारतीचा प्रकार | दर | आर.सी.सी. बांधकाम | इतर पक्के बांधकाम | अर्ध पक्के बांधकाम | कच्चे बांधकाम |
|---|---|---|---|---|---|
| | | **२२,९९०/-** | **१८,६५३/-** | **१३,१६७/-** | **८,४४९/-** |
| **निवासी** | **०.२५%** | ५७.५०/- | ४६.७५/- | ३३/- | २१.२५/- |
| **संस्थेची इमारत** | **०.५०%** | ११५/- | ९३.५०/- | ६६/- | ४२.२५/- |
| **वाणिज्यिक** | **०.७५%** | १७२.५०/- | १४०/- | ९८.७५/- | ६३.५०/- |
| **औद्योगिक** | **०.७५%** | १७२.५०/- | १४०/- | ९८.७५/- | ६३.५०/- |

### ४५ मी.पेक्षा उंच इमारत

| इमारतीचा प्रकार | दर | आर.सी.सी. बांधकाम | इतर पक्के बांधकाम | अर्ध पक्के बांधकाम | कच्चे बांधकाम |
|---|---|---|---|---|---|
| | | **२२,९९०/-** | **१८,६५३/-** | **१३,१६७/-** | **८,४४९/-** |
| **निवासी** | **०.५०%** | ११५/- | ९३.५०/- | ६६/- | ४२.२५/- |
| **संस्थेची इमारत** | **०.७५%** | १७२.५०/- | १४०/- | ९८.७५/- | ६३.५०/- |
| **वाणिज्यिक** | **१.००%** | २३०/- | १८६.५०/- | १३१.७५/- | ८४.५०/- |
| **औद्योगिक** | **१.००%** | २३०/- | १८६.५०/- | १३१.७५/- | ८४.५०/- |

अमरावती महानगरपालिका मार्फत भारतीय राष्ट्रीय इमारत संहितेच्या भाग ४ मध्ये वर्गीकृत केल्याप्रमाणे वरील तक्त्यामध्ये दर्शविल्यानुसार इमारतीचे प्रकारनिहाय ४५ मी.पर्यंत व ४५ मी. पेक्षा उंच इमारतीकरीता वरील तक्त्यामध्ये त्यांचे समोर दर्शविलेल्या दरानुसार अग्निशमन फी आकारणी करणेकरिताचे प्रस्तावास मा.आयुक्त यांची दि.०९/०६/२०२३ रोजी मंजुरात प्राप्त झाली आहे.

उपरोक्त प्रशासकीय विषय सर्वसाधारण सभेचे मंजुरी करिता सादर करण्यात आला आहे. परंतु, सद्यस्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने सदर प्रशासकीय विषयास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव मंजुर व कायम

**स्वा./-**
**नगरसचिव,**
**महानगरपालिका,अमरावती**

**स्वा./-**
**प्रशासक,**
**महानगरपालिका,अमरावती**

नगरसचिव
महानगरपालिका, अमरावती.